**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ७९९/२०२३**
शासन वि. गंगुबाई उर्फ गायत्री
निशाणी क्र. २४

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ यांची जबानी</u>**
<u>शपथेवर प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की</u>,

माझे नांव - **मनिषा प्रकाश लोखंडे**,
वय - ३३ वर्षे,
धंदा - नोकरी, महिला पोलीस नाईक,
रा. - मुरुम, ता. उमरगा जि. धाराशिव

**<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे विधीज्ञ श्री. बी. के. साळवे यांचेकडुन</u>**

**१.** दि. १०/१०/२०२३ रोजी मी मुरुम पोलीस स्टेशन येथे पोलीस नाईक म्हणून कार्यरत होते. सदर दिवशी आलुर बिट चे बीट जमादार वाघमारे यांनी आम्हाला आलुर बिट येथे छापा टाकयचा आहे त्यासाठी तुम्ही आमच्यासोबत चला असे सांगितले. त्यावेळेस आमच्या सोबत पोलीस कॉन्स्टेबल लोंढे व पोलीस कॉन्स्टेबल परीट होते. आम्हाला गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, आलुर येथे एक महिला दारु विक्री करीत आहे. त्यामुळे मी व माझे सहकारी दोन पंचांना सोबत घेऊन आलुर येथे गेलो असता आलुर येथील अचलेर रोडवर गेलो असता तिथे एक महिला गावठी हातभट्टी दारु विक्री करत असल्याचे मिळून आली. तिच्या ताब्यामधून गावठी हातभट्टी दारुच्या १ लिटरच्या २० बाटल्या मिळून आल्या. सदर महीलास तिचे नाव गाव विचारले असता तिने तिचे नाव गंगुबाई असे सांगितले. सदर घटनेचा पंचनामा हा वाघमारे यांनी केला. त्यानंतर आरोपीविरुध्द पोलीस स्टेशनला येऊन रितसर फिर्याद दाखल केली. सदर फिर्याद मला दाखविली असता ती तीच असून त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे व त्यावर माझी सही आहे. त्यास **<u>निशाणी क्रमांक २५</u>** देण्यात येते. आरोपी आज न्यायालया समोर हजर नाही. मी आरोपीला पाहील्यास ओळखू शकते.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास आरोपी तर्फे विधिज्ञ श्री.यू.आर.शेंडगे यांचेकडुन.</u>**

**२.** गुप्त बातमी मिळाल्याची मी स्टेशन डायरी येथे नोंद केली. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझे सहकारी यांनी दोन पंचासहीत घटनास्थळी जाऊन छापा टाकला नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळी कोणतीही महिला मिळून आली नाही व तिने तिचे नाव गंगूबाई असे सांगितले नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळी जाऊन कोणताही पंचनामा तयार केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, वरीष्ठांच्या सांगण्यानुसार केसेचा कोटा पूर्ण करण्याकरीता खोटी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील संपूर्ण मजकुर खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती
स्वाक्षरीत/-
( श्री.के.एन. निवडंगे )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, उमरगा
**( न्यायालय क्र. २)**

दिनांक - ०८/०१/२०२६